सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in


संदर्भ: परीक्षा/अभि./ ६००

दिनांक: २६ /०४ /२०२५

प्रति
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील Carry On सुविधेअंतर्गत उन्हाळी २०२५ सत्र परीक्षांचे अर्ज भरण्यास एक (०१) दिवसाची अंतिम मुदतवाढ...**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. ३८/२०२५ (जा.क्र.सीबी/३४, दिनांक २२/०२/२०२५)
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/अभि./३६४, दिनांक २८/०२/२०२५.
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/अभि./४०७, दिनांक ०७/०३/२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकान्वये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना एप्रिल/मे २०२५ परीक्षेसाठी पुढील वर्गामध्ये (कॅरी ऑन) सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ व ३ अन्वये संबंधित विद्यार्थ्यांची माहिती व परीक्षा अर्ज भरुन घेण्यात आलेले आहेत. सदर कालावधीत तसेच तदनंतर विद्यार्थ्यांचा Photocopy आणि Revaluation नंतर निकालात बदल झालेला असेल अशा कॅरी ऑन विद्यार्थ्यांची माहिती व परीक्षा अर्ज भरावयाचे राहिलेले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता एक (०१) दिवसासाठी अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

एप्रिल/मे २०२५ परीक्षेतील कॅरी ऑन सुविधेतर्गत ज्या विद्यार्थ्यांचे पाचव्या, सहाव्या, सातव्या आणि आठव्या सत्राचे अंतर्गत परीक्षेतील Insem, Oral, Practical, TW and Audit Course या विषयांचे नियोजन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर नियोजन लेखी परीक्षेपूर्वी/परीक्षेनंतर करण्यात यावे.

ज्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेश देण्यात आलेला असून हिवाळी २०२४ मध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले नव्हते परंतु प्रथम वर्ष ऑक्टोबर, २०२४ आणि द्वितीय वर्ष ऑक्टोबर २०२४ या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला असून ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित परीक्षेच्या Photocopy आणि Revaluation साठी अर्ज केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांचा Photocopy आणि Revaluation नंतर निकालात बदल झाल्यास, अशा पात्र विद्यार्थ्यांना देखील कॅरी ऑनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

कॅरी ऑन सुविधे अंतर्गत पात्र असणा–या विद्यार्थ्यांसाठी तृतीय वर्ष आणि चतुर्थ वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमांची माहिती व परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत एक (०१) दिवसासाठी दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी विशेष बाब म्हणून वाढविण्यात येत आहे.

| परीक्षा अर्ज भरण्याकरिता अंतिम विशेष बाब मुदतवाढीची कालावधी | मुदतवाढ कालावधीतील परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा कालावधी |
|---|---|
| दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी मध्यरात्री १२.०० ते दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी रात्री ११.५९ पर्यंत | दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी मध्यरात्री १२.०० ते दि. २९ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत |

हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या निदर्शनास तात्काळ आणावे, तसेच एकही पात्र विद्यार्थी कॅरी ऑन संधीपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण दक्षता संस्था/महाविद्यालयाने घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ